PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 2

# तिवसा तहसीलमधील आठवडी बाजार सेवाक्षेत्र

**डॉ. सुनील आखरे**

सहयोगी प्राध्यापक तथा भूगोल विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय कुऱ्हा.
ता. तिवसा जिल्हा अमरावती
महाराष्ट्र भारत

**सारांश:-**

मानवाद्वारे केल्या जाणारे बाजार कार्य हे त्याच्या उदरनिर्वाहाचा मूलाधार असतो त्यामुळे बाजार ही मानवाच्या आर्थिक क्रीयांपैकी एक महत्वपूर्ण आर्थिक क्रिया होय. आठवडी बाजार केंद्र सभोतालच्या प्रदेशातील लोकांना सेवा पुरवण्याशी संबंधित असतात. ज्याप्रदेशातून ग्राहक आपल्या बाजारक्रिया पूर्ण करण्याकरिता बाजार केंद्राला भेटी देतात त्या प्रदेशाला बाजार सेवाक्षेत्र असे म्हणतात. तिवसा तहसीलमधील आठवडी बाजार सेवाक्षेत्राचे अध्ययन केले असता असे स्पष्ट होते कि, तिवसा तहसीलमध्ये दोन बाजार सेवाक्षेत्र जास्त असून एक बाजार सेवाक्षेत्र केवळ मोठ्या बाजार केंद्राजवळ स्थित आहे. तिवसा तहसीलमधील ग्राहकांचा जवळच्या बाजारकेंद्राला भेट देण्याकडे कल आहे. बाजारकेंद्राला भेट देतांना येथील ग्राहक आपल्या घरापासूनचे अंतर व बाजारकेंद्रावर मिळणाऱ्या वस्तूंची विविधता या बाबींचा विचार करतो.

**प्रस्तावना:-**


ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या वाढ, विकास, व नियोजनामध्ये आठवडी बाजार केंद्राची महत्वपूर्ण भूमिका असते. बाजारात पुरवल्या जाणाऱ्या विविध सेवांवर त्या बाजाराचे महत्व ठरत असते. प्रत्येक केंद्रावरील व्यापारी सेवा व क्रिया भिन्न असतात त्या बाजार केंद्राचे स्थान तेथील लोकसंख्या आणि सभोवतालच्या प्रदेशातील लोकांची क्रयशक्ती यावर अवलंबून असते. आठवडी बाजार केंद्र सभोतालच्या प्रदेशातील लोकांना बाजार विषयक सेवा पुरवीत असते. ज्याप्रदेशातून ग्राहक आपल्या बाजारक्रिया पूर्ण करण्याकरिता

बाजार केंद्राला भेटी देतात त्या प्रदेशाला बाजार सेवाक्षेत्र असे म्हणतात. आठवडी बाजार केंद्राचा अभ्यास करीत असतांना त्या बाजार केंद्रांच्या सेवाक्षेत्राचे अध्ययन करणे आवश्यक आहे. प्रस्तुत शोध निबंधात तिवसा तहसीलमधील आठवडी बाजारांच्या सेवाक्षेत्राचा अभ्यास केला आहे.

**बीजसंज्ञा:-**

बाजार सेवाक्षेत्र, आठवडी बाजार

**अभ्यास क्षेत्र:-**




( नकाशा क्र.१ )

महाराष्ट्रातील पश्चिम विदर्भाच्या अमरावती जिल्ह्याचे तिवसा तहसिल आहे. तिवसा तहसिलचा अक्षवृत्तीय विस्तार २०°५३'४८" उत्तर ते २१°११'३०" उत्तर अक्षांश व ७७° ५३' पूर्व ते ७८°१०' पूर्व रेखांश आहे ( नकाशा क्र.१) तिवसा तहसिलचे एकूण क्षेत्रफळ ५६२ चौ.कि.मी. आहे. २०११ च्या जनगणनेनुसार तिवसा तहसिलची लोकसंख्या १०४७२८ आहे . या तहसीलमध्ये एकूण ७१ आबाद गावे आहे.

**उदिष्ट्य:-**

तिवसा तहसीलमधील आठवडी बाजार सेवाक्षेत्रांचे अध्ययन करणे.

**पद्धतीशास्त्र :-**

प्रस्तुत संशोधनामध्ये आठवडी बाजार सेवाक्षेत्रांचे अध्ययन करण्याकरिता तिवसा तहसीलमधील सर्व १३ आठवडी बाजार केंद्रांना प्रत्येक्ष भेट देऊन माहिती संकलित केली आहे. या करिता तिवसा तहसीलमधील आठवडी बाजार केंद्रावरील नमुना निवड पद्धतीने ग्राहकांची निवड करून त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. आठवडी बाजार सेवाक्षेत्र ठरविण्याकरिता अनुभवजन्य पद्धतीचा (Empirical Method) वापर केला. यामध्ये ग्राहकांचे गाव व बाजार केंद्र यांना सरळ रेषेत जोडून बाजार क्षेत्राचा नकाशा तयार केला.

**तिवसा तहसीलमधील आठवडी बाजार सेवाक्षेत्र:-**

बाजार केंद्राला भेट देणारे ग्राहक केवळ बाजार केंद्रावरील असतात असे नसून बाजार केंद्राच्या सभोवतालच्या प्रदेशातील ग्राहक सुद्धा आपल्या बाजारक्रियांच्या पूर्ततेसाठी त्या बाजार केंद्राला भेटी देतात. त्या सर्व प्रदेशाला त्या बाजारकेंद्राचे सेवाक्षेत्र असे म्हणतात. सेवाक्षेत्राची व्याख्या पुढील प्रमाणे केल्या गेली आहे.

१) "सेवाक्षेत्र किसी सेवाक्षेत्र के चतुर्दिक सेवित क्षेत्र होता है जिसकी जनसंख्या को वह विभिन्न प्रकारकी सेवा प्रदान करता है I" श्रीवास्तव (१९९८).

२) "An area on the surface of the earth around a settlement that offers goods and services to consumers living in the area, " Saxena (2004).

वरील व्याख्येप्रमाणे तिवसा तहसीलमधील आठवडी बाजार केंद्राचे सेवाक्षेत्र निश्चित करून त्याचे अध्ययन करणे आवश्यक असल्यामुळे सेवाक्षेत्राच्या सीमा निश्चित करण्याकरिता अनुभवजन्य पद्धतीचा (Empirical Method) उपयोग करण्यात आला आहे.

अनुभवजन्य पद्धतीमध्ये बाजार केंद्राला भेट देणाऱ्या ग्राहकांच्या गावाचे क्षेत्र जोडून नकाशा तयार करण्यात आला आहे (नकाशा क्रमांक १) ग्राहक हा एकाच बाजार केंद्राला भेट देतो असे नसून तो दोन किंवा जास्त बाजार केंद्राला भेट देत असतो. त्यामुळे एखादा प्रदेश दोन किंवा जास्त सेवाक्षेत्राचा भाग असू शकतो यावरून सेवाक्षेत्राचे पुढील प्रकार करता येईल.

**अ) स्वतंत्र सेवाक्षेत्र :-**

तिवसा तहसीलमधील जो प्रदेश एकाच बाजार केंद्राच्या सेवाक्षेत्राचा भाग आहे अशा सेवाक्षेत्राला स्वतंत्र सेवाक्षेत्र असे म्हणतात. या प्रकारचे सेवाक्षेत्र तिवसा तहसिलमध्ये मोठ्या बाजार केंद्रा जवळ दिसून येते कारण मोठ्या बाजार केंद्राची आकर्षकता जास्त असल्यामुळे ग्राहक इतर दुसऱ्या बाजार केंद्रावर जात नाही.


**ब) दोन बाजार सेवाक्षेत्र:-**

या प्रकारचे सेवाक्षेत्र मुख्यत: मोठ्या बाजार केंद्राच्या सेवाक्षेत्रात असणाऱ्या छोट्या बाजार केंद्राच्या सेवाक्षेत्रात असणाऱ्या छोट्या बाजारकेंद्राचे सेवाक्षेत्र असते. या प्रदेशातील ग्राहक छोट्या बाजार केंद्राला सुद्धा भेटी देतात. तिवसा तहसीलमध्ये दोन बाजार सेवाक्षेत्र जास्त आहे

**क) अनेक बाजार सेवाक्षे :-**

या प्रकारचे सेवाक्षेत्र दोन किंवा दोन पेक्षा जास्त मोठ्या बाजार केंद्राच्या सीमावर्ती प्रदेशामध्ये असलेल्या छोट्या बाजार केंद्राचे सेवाक्षेत्र होय. येथील ग्राहक दोन

किंवा दोन पेक्षा जास्त बाजार केंद्राला भेटी देतात. अनेक बाजार सेवाक्षेत्र अतिशय कमी क्षेत्रापुरते मर्यादित आहे




स्त्रोत:- क्षेत्रीय कार्य (नकाशा क्र.२)

**ड) नकारात्मक सेवाक्षेत्र:-**

काही प्रदेशामध्ये जंगल, वाळवंट किंवा इतर प्रतिकूल परिस्थितीमुळे लोकवस्तीचा अभाव असतो. त्यामुळे त्या प्रदेशामधून ग्राहक बाजार केंद्राला भेट देत नाही.

त्यामुळे असा प्रदेश कोणत्याच बाजारकेंद्राच्या सेवाक्षेत्राचा भाग नसतो. याला नकारात्मक सेवाक्षेत्र म्हणता येईल. तिवसा तहसीलमधील ओसाड गावांच्या प्रदेशाचा समावेश नकारात्मक सेवाक्षेत्रामध्ये होतो.

**निष्कर्ष:-**

तिवसा तहसीलमधील आठवडी बाजार सेवाक्षेत्राचे अध्ययन केले असता खालील निष्कर्ष काढता येईल.

१) तिवसा तहसीलमधील आठवडी बाजारातील ग्राहकांचा सर्वात जवळच्या बाजारकेंद्राला भेट देण्याचा कल आहे.

२) तिवसा तहसीलमध्ये दोन बाजार सेवाक्षेत्र जास्त असून एक बाजार सेवाक्षेत्र केवळ मोठ्या बाजार केंद्राजवळ स्थित आहे.

३) तिवसा तहसीलमधील ग्राहकांचा जवळच्या बाजारकेंद्राला भेट देण्याकडे कल आहे. बाजारकेंद्राला भेट देतांना येथील ग्राहक आपल्या घरापासूनचे अंतर व बाजारकेंद्रावर मिळणाऱ्या वस्तूंची विविधता या बाबींचा विचार करतो.

**संदर्भ :-**

1) आखरे, एस. बी., “विपणन भूगोल” प्रथम आवृत्ती लक्ष्मी बुक पब्लिकेशन, सोलापूर, २०१५.

२) Gedam, D.A., “Periodic Marketeting System & Netwark.” Nagpur : Allied Associates, 1986.

३) Saxena, H. M., “Marketing Geography”. Jaipur : Rawat Publication, 2004.

४) श्रीवास्तव, हरिओम, “विपणन भूगोल सरयूपार मैदान (उत्तर प्रदेश ) का प्रतिक अध्ययन”. गोरखपूर : एसोसिएशन ऑफ मार्केटिंग ज्योग्राफर्स ओफ इंडिया, १९९८